लोकमत

# शिवाजी विद्यापीठात रक्तदान शिबिर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ आणि विवेकानंद केंद्र कन्याकुमारी शाखा कोल्हापूर यांच्यावतीने स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांच्या जन्मदिनी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. छत्रपती प्रमिलाराजे शासकीय रुग्णालय रक्तपेढीच्या सहकार्याने हे शिबिर पार पडले. शिबिराची सुरुवात शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी कुंडीतील रोपास पाणी घालून आणि दीप प्रज्वलनाने केली. स्वागत विवेकानंद केंद्राचे प्रमुख अरुण कुलकर्णी यांनी केले.